# प्रकरण दुसरे

## महानुभाव पंथाची पूर्वपीठिका व त्यांचे साहित्य पंथाचे नामकरण चर्चा, महानुभावपंथाची बैठक, आम्नाय, महानुभावीय शिष्य परंपरा, महानुभावीय वाङ्मय

# प्रकरण दुसरे

## महानुभाव पंथाची पूर्वपिठिका व त्यांचे साहित्य पंथाचे नामकरण

## चर्चा, महानुभावपंथाची बैठक, आम्नाय, महानुभावीय शिष्य परंपरा,

## महानुभावीय वाङ्.मय

### महानुभाव पंथाची पूर्वपीठिका:

ज्ञानेश्वर पूर्व कालात आद्य शंकराचार्यांनी वैदिक धर्माचे पुनरूज्जीवन करण्याचा प्रयत्न करून समाजाला नवी दिशा दाखविली, परंतु धर्माचा खरा गाभा लक्षात न घेता त्यांच्या बाह्यांगावरच समाजाकडून अधिक भर देण्यात येऊ लागला आणि समाजात मोठ्या प्रमाणावर धर्माचे स्तोम माजले. अंध-श्रध्दांना उधाण आले. त्यामुळे कर्मकांडाचे स्तोम माजले, व्रतवैकल्ये, तंत्रामंत्रा, आयाससायास, नवस, नैव्यद्य, बोने, करण्यात नि देवतांना प्रसन्न करून घेण्याची लोकांची प्रवृत्ती वाढली. देवतांच्या उपवासानेच लवकरात लवकर फलप्राप्ती व्हावी अशी अपेक्षा प्रत्येक व्यक्तिला वाटू लागली. प्रत्येक व्यक्ती स्वयंकेंद्रीत आणि स्वार्थ परायण बनू लागली. समाजकल्याण करून समाजाचे हित चिंतनाने उच्चवर्णीय याच कर्मकांडाच्या चक्रात गुंतून पडले. गुरफटले गेले. सामाजिक जीवनात सुत्राबध्दता असली तरीही अध्यात्मिक क्षेत्राबाबत लोक-मनात प्रक्षोम होतात. हेमाड पंडिताच्या ग्रंथात दोन हजारावर व्रते सांगितली गेली आहेत आणि त्याचसाठी त्याचा "चतुर्वर्ग चिंतामणी" हा ग्रंथ पूजणीय झाला. त्या व्रतवैकल्यात गुरफटलेल्या समाजाला अध्यात्मिक जीवनाची अंगे समृध्द करण्यास अवकाश प्राप्त झाला असावा.

कर्मकांडाचे स्तोम माजल्यामुळे उच्च वर्णीयांना अधिक उच्चता प्राप्त झाली होती. सामान्यसमाजातील लोकांना पिळवटून काढले जात होते. आध्यात्मिक क्षेत्रात विशिष्ट वर्णाव्यतिरिक्त इतरांना मोक्षाचा मार्ग खुला नव्हता. मोक्ष मार्गाचे रहस्य सांगणारे ज्ञान संस्कृत ग्रंथातून, वेदपुराणातून

कडेकुलूपात बंदिस्त झाले होते. समाजातील मोठा वर्ग अध्यात्म प्राप्तीच्या ज्ञानासाठी अतिशय उत्सुक झाला होता. पण या समाजाला त्यापासून वंचितच रहावे लागत होते. अशा अवस्थेत या दिशाहीन झालेल्या सर्व लोकांना माणूस म्हणून आपल्यात सामावून घेणारे उदात्त व उदार तत्त्वज्ञान सांगणारे बौध्द, जैन, लिंगायत, नाथ, महानुभाव वारकरी यासारखे विविध धर्म व पंथ उदयाला आले. व त्यांच्याकडे समाजातील मोक्ष मार्ग वंचीत बहुसंख्य वर्गाचा ओघ सुरु झाला. स्त्रीया वैश्य शुद्रादी वर्गही परमगती पावतील असे स्पष्ट प्रतिपादन करणाऱ्या गीतेचे स्वरुप ज्ञानेश्वरांनी विषद केले. ब्रह्म् विद्येचा सुकाळ करण्याची त्यांनी जणू शपथच घेतली व ही तत्कालीन काळाची मोठी गरज होती. सामान्यांच्या अध्यात्मिक उध्दाराचा कळवळा या सर्व प्रयत्नांमागे निश्चितच होता. आर्थिक आणि वर्णभेदातील विषमता समाजाला उखाडून टाकीत होती. अशा परिस्थितीत समाजाला समता, न्याय, भूतदया, त्याग, इत्यादी तत्वांची माहिती पटवून देऊन स्व-धर्माची जाणीव प्राप्त करुन देण्याचे कार्य या पंथांनी हाती घेतले.

बाराव्या शतकाच्या उदयास आलेल्या महानुभावपंथाने या दृष्टीने खूप मोठे नि मोलाचे कार्य केले आहे. महानुभावपंथ हा हिन्दू धर्मांतर्गत एक संप्रदाय आहे व तो महाराष्ट्रात उदयास आला असला तरी एकेकाळी त्याचा प्रसार काबुल कंदहारपर्यंत झाला होता. परंतु १९४२ चे वेळी भारताची फाळणी झाली व स्वतंत्र पाकिस्तानची निर्मिती झाली. त्यानंतर या उत्तरेकडील भागातील महानुभावीय पंथाच्या मठांचे अस्तित्व नामशेष झाले. व तेथील महानुभावीय महंत इतरत्र विस्कळीत झाले. सध्या या पंथाचे अनुयायी प्रामुख्याने महाराष्ट्र, मध्य प्रदेश, पंजाब, या तीन प्रांतांत पसरलेले दिसून येतात. महाराष्ट्रात त्यांचे अस्तित्व नागपूर व वऱ्हाड भागात विशेषत्वाने जाणवते. महाराष्ट्रात महानुभाव या नावाने प्रसिध्द असलेला हा पंथ दिल्ली, पंजाबकडे 'जयकृष्णी पंथ' म्हणून ओळखला जातो. त्याची

स्थापना चक्रधर स्वामींनी इ.स. १३ व्या शतकात केली. महानुभावांचे मत हे एक द्वैती मत आहे. त्यानुसार जीव, प्रपंच, देवता यापासून पूर्ण स्वतंत्र असणारा एक नित्य मुक्त परमेश्वरच मोक्ष देण्यास समर्थ असतो. हे चक्रधरांच्या सूत्रपाठातील पहिले सूत्र म्हणजे महानुभाव तत्वज्ञानाचा पायाच आहे. त्या परमेश्वराची भक्ती करून त्याचे ज्ञान प्राप्त करून घेणे हे या पंथाचे एकमेव साध्य आहे. महानुभावीयांच्या मतानुसार परमेश्वर जीवाच्या उध्दारासाठी अवतार घेत असल्याने त्यात अवतारवाद आलेला आहे. या महानुभावपंथास महात्मा, अच्युत भटमार्ग, परमार्ग, अशीही नावे आहेत. या सर्वांनी परमेश्वराचे पंचावतार मानलेले आहेत.

१) श्रीकृष्ण चक्रवर्ती, २) श्री दत्तात्रय प्रभू, ३) चांगदेव राऊळ, ४) गोविंदप्रभू तथा श्री गुंडम राऊळ, ५) श्री चक्रधर स्वामी या पाच अवतारांना महानुभाव पंचकृष्ण मानतात. दत्त भक्ती व कृष्ण भक्ती यांच्या मिलनाचे हे सूचक आहे. त्यामुळे महानुभावपंथ कृष्णसंप्रदाय तसाच दत्त संप्रदायही ठरतो. मात्र तो नरसिंह सरस्वतीच्या दत्त संप्रदायाहून वेगळा आहे. त्याचबरोबर महानुभाव यांचा दत्त हा त्रिमुखी नाही. तर तो एकमुखी अवधूत आहे व श्रीकृष्ण हा विष्णू या देवतेचा अवतार नसून ते प्रत्यक्ष परब्रह्म आहे असे महानुभाव मानतात. महानुभाव हे मूर्तीपुजक असले तरी ते ज्या मुर्तीची पूजा करतात ती मूर्ती "संबंधी" पाषाणाची असते हा पाषाण परमेश्वरी अवताराचा संबंध असलेला असतो. असे त्यांचे मत असते. हा संन्यास-मार्ग आहे. त्यामुळे तो निवृत्तीवादी पंथ आहे. आणि म्हणून साहजिकच त्यांचा आचारधर्म हा निवृत्तीवादी आहे. या पंथाने मराठी ही आपली धर्मभाषा मानली आहे आणि त्यामुळे त्यांच्या अनुयांयांनी विपुल प्रमाणावर ग्रंथरचना केलेली आढळते. त्यांचे सुरवातीचे ग्रंथ बाळबोध लिपीत लिहिले गेले आहेत. नंतर तिला सांकेतिक लिपी लाभली आहे. परंतु त्यामुळे पंथेतर लोकांना ते समजणे दुर्गम होऊन बसले व त्याचा परिणाम असा झाला की,

महानुभावीय वाङ्.मयाला उज्ज्वल परंपरा असूनही सर्वसाधारण वाचकांच्या दृष्टीने ते निरुपयोगी झाले. ते बहुजनांपासून अज्ञातवासातच राहिले. परंतु आज महानुभाव महंतांच्या औदार्यामुळे संशोधकांच्या परिश्रमामुळे हा अज्ञातवास संपून हे महानुभावीय वाङ्.मय उजेडात आले आहे व सर्वांच्या अभ्यासाला ते सुलभ झाले आहे. ते सर्वगुण संपन्न असून विषयाची व रचनेची त्याच्यात विविधताही पुष्कळ आहे. महानुभावपंथाचा महाराष्ट्रावरही प्रभाव जाणवतो आहे. १९२० च्या सुमारास ती सुमारे २२ हजार होती. परंतु आज ती किती असावी हे समजण्यास मार्ग नाही. कारण सद्यस्थितीतील लोकगणनेत महानुभावांचा स्वतंत्र निर्देश केलेला नसतो. परंतु तरीही ही संख्या २५०००/- हजारांनी वाढली असेल. 'रिधपूर' आणि 'माहूर' ही महानुभावीयांची दोन पवित्र क्षेत्रे आडवाटेवरच आहेत. शूद्रातिशूद्र अतिमागास जातीतूनच प्रामुख्याने तो आढळतो. महानुभावपंथात कृष्णाला श्री चक्रधार असे म्हणतात. त्यामुळे चक्रधरांना हे नांव प्राप्त झाले. महानुभावपंथीय लोक चक्रधरांना श्रीकृष्ण अवतारच मानतात. चक्रधरांना सामान्यपणे ११२ वर्षाचे दीर्घायुष्य लाभले. दत्तात्रयाच्या साक्षातकारानंतर पंथीय तत्वज्ञानाच्या प्रसारास त्यानी सुरुवात केली. त्याचे सुमारे पाचशे शिष्य व तेरा शिष्या होत्या असे महानुभाव पंथीयात उल्लेख सापडतो. श्रीकृष्ण व दत्त या दोन देवता त्यांच्या पुजास्थानी होत्या. या पंथाने संन्यास मार्गावर भर दिला आहे. स्त्री आणि शूद्रांना या पंथात संन्यासाची मुभा आहे. महानुभाव संप्रदायाचे मुख्य तीर्थक्षेत्र ऋध्दिपूर हे होते. चक्रधारानंतर नागदेव, भावेदेव, भास्कर, परशाराम, असे पंथाचे चार आचार्य झाले. पुढे या पंथाचे तेरा आम्नाय निर्माण झाले.

श्रीभगवद्‌गीता आणि भागवत हे दोन ग्रंथ या पंथाने पुजनीय मानलेले आहेत. हा पंथ द्वैती असून त्यांच्याकडून गीतेचाही द्वैती अर्थ लावला जातो. कृत युगात हंसावतार, त्रेता युगात दत्तावतार, द्वापारयुगात श्रीकृष्ण आणि

कलियुगात चक्रधर असे चार अवतार महानुभावपंथ मानतो. त्यांची गुरुपरंपरा कृष्ण, दत्तात्राय, द्वारावतीचे चांगदेव राऊळ, गोविंदप्रभु आणि चक्रधर अशी मानली गेली आहे. परमेश्वर हा प्राणीमात्राच्या उध्दाराकरता गर्भपतीत व दवाडणो, असे तीन प्रकारचे अवतार परमेश्वर घेत असतो. श्रीकृष्ण हा "चक्रधाराचा" तो पतीत अवतार व मूळ देहातील एखाद्या जीवास दवडून घेतलेला गोविंदप्रभूचा अवतार तो दवडण्याचा अवतार होय, महानुभावपंथ व वारकरी संम्प्रदाय यांच्यात साध्य, साधनात फारसा फरक नाही. दोन्ही संप्रदायाच्या देवता कृष्ण हाच आहे. दोन्हीही संप्रदाय त्याचीच उपासना करतात. सत्संग गुरुसेवा, नामस्मरण हे परमेश्वराला प्राप्त करून घेण्याचे मार्ग आहेत व या मार्गानेच मुक्ती मिळते असे दोघांचेही मत आहे. परंतु महानुभावपंथ मात्रा आपल्या द्वैती मतात म्हणतो, की भक्त हा कधीही भगवंत होऊ शक्त नाही. समतेपेक्षा समिपतेला तो मानणारा आहे. आनंदाची भावनाच या द्वैत मतामागे आहे. जीव हा अनादी आणि नित्य वस्तू असल्याने तो परमेश्वराशी अद्वैत साधू शक्त नाही. असे महानुभाव मानतात. वारकरी संप्रदाय मात्रा या द्वैताकडून अद्वैताकडे, सगुणरुपाकडून निर्गुण रुपाकडे जाणारा आहे.

श्रीचक्रधार, गोविंदप्रभू या महात्म्यांनी (देवतांनी) जिथे जिथे वास्तव्य केले ती सर्वच स्थाने महानुभावपंथ पूजनीय मानतो. फलटण, माहूर, ऋध्दिपूर ही या पंथाची तीर्थस्थाने म्हणून मानली गेली आहेत. महानुभावाचा अनुयायी वर्ग शुद्रातिशुद्रासारख्या मागास जातीतूनच प्रामुख्याने आढळतो. अस्पृश्यता व उच्चनिचतेच्या कल्पनेचा या पंथाने त्याग केला आहे. स्त्रियांनाही शिष्यत्व दिले गेल्याने या पंथाला प्रारंभापासूनच कांहीशा प्रतिकूल परिस्थितीलाही तोंड द्यावे लागले आहे. स्त्री विटाळ या पंथाला त्याज्य नाही. या आत्यंतिक निवृत्तीवादी पंथाने सर्वसंग परित्याग करून एकांत पत्करण्याचा उपदेश केला आहे. प्रपंच आणि परमार्थ यांची ओढाताण

करीत जीवन जगणाऱ्या सामान्य लोकांना हे उत्कटतेचे आवाहन आहे. महानुभावपंथ मोक्षाचा विचार करतात तर वारकरी संप्रदायात लोकोध्दाराची प्रेरणा होते. श्री चक्रधरांनी आपल्या सर्व शिष्यांना कडक आचार धर्मांची शिकवण दिली होती. भिक्षा कोठे व केंव्हा मागावी ती मागण्याची रीत, वास्तव्य कोठे आणि किती दिवस असावे, कसे असावे, त्याविषयीचे नियम शिष्यांना बंधनकारक होते. अशा अनेक सूचना महानुभावीय अनुयांयाना देण्यात आल्या होत्या. यातूनच महानुभावपंथाचा आचारधर्म प्रकट झाला आहे. वैयक्तिक मोक्ष मिळवण्याच्या वर्तुळात प्रत्येक-जण गुंतल्याने या पंथास वारकरी संप्रदायाप्रमाणे व्यापक स्वरूप प्राप्त झाले नाही. वारकरी पंथातील सुलभ साहित्य व त्यांची वैचारिक व्यापक बैठक पंथाला स्थिरता देण्यास कारणीभूत ठरते. महानुभावपंथाने वारकरी संप्रदायाला मराठीत साहित्य निर्माण करून जी मदत केली, त्यामुळेच मराठी साहित्य संपन्न झाले. हा हातभार मराठी साहित्याला पोषक ठरला. त्यातूनच महानुभावीय कवी, लेखक यांच्याही प्रतिमा उजळ झाल्या. अभ्यासकांना त्यांची ओळख झाली. आज महानुभावपंथाला त्याचा शोध घेणे व अभ्यास करणे हे प्रेरणादायी झाले व त्यातूनच महानुभाव-पंथाच्या वाङ्मयाचा अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांना सुलभ उद्बोधक झाले.

पंथाचे नामकरण - चर्चा:

तेराव्या शतकात उदयास आलेल्या महानुभाव पंथाला आज सुमारे सातशे वर्षे होत आली. महाराष्ट्रात हा पंथ महानुभावपंथ म्हणून उदयास आला व त्याच नावाने तो ओळखला जात आहे. हे नांव थोडेसे अलीकडचेच आहे. परंतु सर्वत्र याच नावाने तो परिचित नाही. तर त्याला वेगवेगळी नावे वेगवेगळया प्रदेशात आहेत व त्या त्या नावाने तो तेथे ओळखला जातो. पंजाबमध्ये त्याला 'जयकृष्णी' पंथ म्हणतात. बुंदेलखंडात त्याला अच्युतपंथ म्हणून ओळखले जाते. त्याचबरोबर संन्यासी, योगी, हंस,

परमहंस, यती, मुनी, महात्मा, महानुभाव, भिक्षुक, ज्ञानी, याही नावानी तो ओळखला जातो. आज मात्र या पंथाला इतकी नावे असलेली दिसत नाहीत तर महात्मा, महानुभाव, अच्युत, व जयकृष्ण, इतक्याच नावांनी तो ओळखला जातो. तर डॉ. वि.भि. कोलते यांच्या मतानुसार या पंथाला भट मार्ग व परमार्ग ही नांवे सार्थ वाटतात. त्यांनी वरील यादीत या दोन नावांची भर घातली आहे. कारण ती दोन्ही नावे महानुभावपंथ साहित्यात अनेक ठिकाणी आढळतात. त्याचबरोबर मानभाव या नावाचाही विचार करावा लागेल. अगदी कांही पाठीमागील वर्षांपर्यंत हे नाव या पंथाला रूढ होते. किंबहुना आजही कांही ठिकाणी या नावाचा उल्लेख केला जातो. एकनाथांनी आपल्या ग्रंथात त्याचा नामोउल्लेख केला आहे. ते म्हणतात -

जालो म्हणती मानभाव। अंतरी शुध्द नाही भाव ।
मानभावबाई । आम्हा भिक्षा वाढा कांही ।।
मुळीचाचि मानभाव । वस्त्रे केली काळी ।
कोरके मागूनि । झोळी भरली ।।
होऊनि मानभाव । अवघा बुडविला ठाव ।।[2]

अशा प्रकारे मानभावांचे वरील उल्लेख एकनाथांनी निंदा-व्यंजक केले आहेत. तुकारामांनीही आपल्या गाथेत मानभाव हा शब्द वापरला आहे. परंतु तो मानभाव असा नाही तर "मावभाव" असा आहे. डॉ. वि.भि. कोलते मानभाव हा महानुभाव या शब्दांचा अपभ्रंश समजतात. पण तेच पुढे म्हणतात की, "मानभाव" शब्द ज्याचे अपभ्रंष्ट रूप आहे तो "महानुभाव" या नावाने चक्रधरांचा पंथ आरंभीच नव्हे तर निरंजन माधवाच्या कालापर्यंत ओळखला जात नव्हता.[3] एकनाथांच्या वेळी "मानभाव" हा शब्द निंदाव्यंजक वापरला जात होता. महानुभाव नाही तो "मानभाव" तो

शब्द नाही तर 'महानुभाव' हा गौरवार्थी शब्द आहे. याचा अर्थ असा की "मानभाव" शब्द स्वतंत्र आहे. त्याचा महानुभाव शब्दाशी संबंध नाही त्याच्यात ध्वनीसाम्य आहे इतकेच "मानभाव" शब्दावरून एक लोककथा सांगितली जाते. या कथेत पैठणाच्या एका कृष्णभटाला मातंगीपासून पाच मुलगे झाले व ते मांगभाऊ म्हणून ओळखले जाऊ लागले. चक्रधरांच्या मार्गाच्या विरोधकांनी या पांच मांगभावांचा संबंध महानुभावपंथाच्या पंचकृष्णाशी जोडला व तेव्हापासून हा पंथ मांगभाव किंवा मानभाव या नावाने समाजात रूढ झाला. आज जरी हा शब्दोल्लेख केला जात नसला तरी एके काळी तो लोकांच्या मनात घर करून होता. त्याचा वापर मानभावी "बोलणी मानभावाची आणि करणी कसाबाची," अशा वाक्यांनी केला जात असे. अर्थात मानभाव या पंथाचे मूळ नाव नाही. त्याचबरोबर "महानुभाव" हे ही मूळ नांव नव्हे. "महानुभाव" हा शब्द प्रथमपासून आढळत असला तरीही तो परमार्थाने वापरला गेला आहे. विशिष्ठ पंथाचा अनुयायी या अर्थी नव्हे. प्राचीन ग्रंथकार या शब्दाचा वापर वाच्यार्थाने करतात निरंजन माधवाच्या काळापासून त्याला पंथ विशिष्ठ अर्थ येऊ लागला. तत्पूर्वी तो मानभाव पंथ म्हणून ओळखला जाई. या नावाचे संस्कृतीकरण होऊन महानुभाव शब्द सिध्द झाला व तोच या पंथाचे नवे आणि कायमचे नांव होऊन बसला. पण हे नाव कायम झाले असले तरी पंथाचे ते मूळ नांव नव्हे. ही खरी वस्तुस्थिती आहे.

"मानभावा"बरोबर इतर भावांचा विचार करता या पंथाला महात्मा पंथ म्हटल्याचेही अनेक ठिकाणी आढळून येते. श्रीचक्रधर आपल्या शिष्यांना महात्मा म्हणत त्याचबरोबर महानुभावपंथाचे आद्य आचार्य "नागदेव" (भटोबास) हे ही आपल्या शिष्यांना महात्मा याच नांवाने संबोधित या दृष्टीने चक्रधरांच्या सूत्रपाठाच्या आचार प्रकरणातील "महात्मेनि, प्रिय व्यक्तेया होआवे." महात्मेनि सत्यार्जवा होआवे"[४] त्याचबरोबर नागदेवाचार्यांच्या

सां /

आठवणी सांगणाऱ्या स्मृती स्थळातील संप्रदायिकांचा उल्लेख महात्मा शब्दानी केल्याची अनेक उदाहरणे सापडतात. उदा. तव एकी महात्मा म्हणीतले: हां हां भीवो नका आम्ही भटमार्गीचे महात्मे झालो. मी कायी एकादा चोळी का महात्मा : मां हे आणिले १" एकु दीसु एकु महात्मे अटना निगाले:" वरील सर्व उदाहरणांचा अर्थ इतकाच की, चक्रधरस्वामी आपल्या शिष्यांना महात्मा म्हणून संबोधात असतच पण इतरांच्यातही ते महात्मा म्हणून ओळखले जातात. आणि त्यामुळे संप्रदायात प्रविष्ट झालेल्या त्यांच्या अनुयायांना "महात्मा" हे नाव पहल्याने अशा महात्म्याचा जो पंथ तो महात्मा पंथ म्हणून ओळखला जाऊ लागला. पण तेवढयावरून ते या पंथाचे मूल नांव हे सिध्द होत नाही. कारण एकतर वरील उदाहरणात "भटमार्गीचा महात्मा" असा शब्दप्रयोग आहे. त्यावरून एका विशिष्ट नावाने ओळखल्या जाणाऱ्या पंथातील महात्मा एवढाच मर्यादित अर्थ त्यातून निघतो. लीळाचरित्राच्या एकांक भागात ससीकरक्षण या लीळेत चक्रधरांनी सशाला "महात्मे हो" असे म्हटले असे म्हटले आहे. त्यावरून हे स्पष्ट होते की, महात्मा या शब्दाला तसा कांही भरीव अर्थ नाही. शिवाय या पंथाचे महात्मा हे नांव प्रथम मयंकसूतमुरारी बिडकर यांच्या "दर्शनप्रकाश" या ग्रंथात आढळते. हे डॉ. कोलते यांनी महानुभाव संशोधन या ग्रंथात दाखवून दिले आहे.[५] परंतु हे नांव या पंथाचे मूळ नांव नव्हे. हे ही खरेच आहे.

मयंकसुतमुरारीबिडकर यांच्याच "दर्शन प्रकाश" ग्रंथात "यती, आणि हंस" त्यासची परमहंस जयकृष्णी महात्म्यास । अच्युतपंथ" असा पंथ नामाचा उल्लेख आढळतो. अर्थात ही सर्व नांवे उत्तरकालीन आहेत. पैकी अच्युत पंथ हे नांव सुत्रापाठातील तुम्ही अच्युत गोत्रीय कीगा (आचार १३६) या सूत्रावरून आले असावे परंतु हे प्रचलित नाही व नव्हते. हे नांव महाराष्ट्रात

नाही तर पंजाबमध्ये त्याला जयकृष्णीपंथ असे संबोधले जाते. श्रीकृष्णाच्या उपासकाचा पंथ तो जयकृष्णी पंथ असे संबोधले जाते.[६] या पंथाचा प्रसार उत्तर हिंदुस्थानात सतराव्या शतकाच्या प्रारंभीस झाला आणि तेव्हापासुन हे नाव त्या भागात प्रचलित झाले.[६] महानुभावपंथाला "भटमार्ग" याही नावाने ओळखले जाते. याला कारण म्हणजे एकेकाळी तसे नांव रूढ होते. नागदेवाचार्यांच्या स्मृतीस्थळात भटमार्गाचे अनेक उल्लेख येतात. उदा. स्मृती क्रमांक ५३, २१८ ह्यातील पुढील उल्लेख सूचक आहेत. "नागदेवोभट" नामु मार्गु एकु उदयीला असे या पंथाचे आद्यआचार्य नागदेव यांना भट किंवा भटोबास म्हणत. त्यांचा मार्ग तो भटमार्ग असा या नावाचा अर्थ आहे.[७] परंतु याही नावाला म्हणावा तसा भक्कम पुरावा नाही. भटमार्ग असा शब्दही चक्रधरांनी कधी वापरलेला नाही. भटोबास या शब्दावरून तसे गणले गेले असले तरी त्याला भक्कम असा पुरावा नाही.

अशा प्रकारे वरीलप्रमाणे सर्व नावांचे निराकरण केले असता परमार्ग हे या पंथाचे मूळ मार्ग होय असे डॉ. कोलते म्हणतात. सध्यस्थितीतही "महानुभावीय" पंथाऐवजी मार्ग हा शब्द वापरतात. त्याला कारणही हेच असावे. चक्रधरांनीही आपल्या संप्रदायाला मार्गच म्हटले आहे. या मार्गाशी श्रीदत्तात्राय प्रभु अधिकरण स्मृती स्थळातील केशवदोपी मार्गाते राखीले कीगा किंवा ये मार्गी केली क्रिया कायी वाया जाईल १ ऐसे मार्ग महात्मे निरुपीले असे मार्गाचे उल्लेख येतात. म्हणून महानुभाव पंथाच्या मूळ मार्गाचा शोध डॉ. कोलते मार्ग शब्दाच्या अनुरोधाने घेऊ पहातात. महानुभावपंथीय आपल्या धर्माला "परधर्म" व शास्त्राला परशास्त्र म्हणतात. त्याच्या पोथ्यांच्या समाप्ती लेखनातून इति परम धर्मे महामोक्षैक साधन अशा प्रकारे परधर्माचा उल्लेख होतो. स्वत: चक्रधरांनी "परमधर्म तुमचे जीवन कीगा" असे म्हटले आहे. परधर्माप्रमाणे त्यांच्या शास्त्राचा परशास्त्र

म्हणून उल्लेख होतो. उदा. हा परशास्त्राचा सिंधदातु यावरून डॉ. कोलते असे अनुमान करतात की महानुभावांच्या धर्माला परधर्म व शास्त्राला परशास्त्र असे म्हणतात तसेच त्यांच्या पंथाला परमार्ग असे म्हणतात.

सारांश, महानुभावपंथाचे मूळ नांव परमार्ग असे आहे व त्यातूनच चक्रधरांचा म्हणजेच परमेश्वराचा मार्ग सूचित होतो असे डॉ. कोलते यांच्या विवेचनाचे सार आहे. महानुभाव संप्रदाय हा मराठीतील नाथसंप्रदायानंतरचा पहिला संप्रदाय आहे. नाथसंप्रदाय हा पूर्ण निवृत्तीवादी संप्रदाय होता. संसार हा वर्ज्य आहे. आणि तो माणसाला बांधून ठेवतो. म्हणून नाथपंथीनी तो त्याज्य मानला आहे. नाथपंथ हा निर्गुणोपासक पंथ आहे. नाथसंप्रदायात खूप मोठया प्रमाणावर कांही साहित्य निर्मिती झाल्याचे प्रत्ययाला येत नाही. शिवकल्याण, शिवदिन केसरी इत्यादी ग्रंथकार नाथपंथीय असले तरी कालदृष्टया ते नंतरचे असल्यामुळे त्याचाही विचार येथे येऊ शकत नाही. तर काव्य आणि गद्य या स्वरूपाचे लेखन हे मोठया प्रमाणावर महानुभावीयांनी निर्माण केले आहे. मराठी साहित्यातील आद्य कवयित्री महदंबा ही महानुभावीयच होय. आद्य चरित्रकार म्हाइंभट्ट हा देखील महानुभावीयच होय. "आद्य आख्यान काव्य", महानुभावीय कवयित्री" महदंबा हीच होय. स्वयंवर काव्य लिहिणारा नरेंद्र हा पंडित कवी महानुभावीयच होय. त्याचबरोबर भास्करभट्ट बोरीकर, दामोदर पंडित, पंडित विश्वनाथ यांसारखे श्रेष्ठ ग्रंथकार महानुभावीयांनीच मराठी साहित्याला दिले. त्यावबरोबर सुमारे ६००० ग्रंथ महानुभावपंथातील साहित्यिकांनी मराठी वाङ्मयाला दिलेले आहेत. त्याचबरोबर चक्रधरांसारखा आद्य प्रवर्तक हाही महानुभावीपंथामुळे मिळाला आहे. अशा प्रकारे चरित्र ग्रंथ, आख्यानकाव्य, आद्य गद्य ग्रंथ हे सर्व प्रकारचे साहित्य मराठी साहित्याला देऊन आद्यत्व आपणाकडे घेतले आहे हे महानुभाव पंथाचे श्रेष्ठत्व आहे. त्याचबरोबर जाती धर्मातील उच्चनिचता स्पृश्य अस्पृश्यता नाकारून सामान्यांना सामावून

धोणारा स्त्रियांना शिष्यत्व बहाल करणारा सर्वसमावेशक आद्यपंथ म्हणूनही महानुभावपंथालाच मानले जाते.

प्रवर्तक

महानुभावपंथ हा तेराव्या शतकात महाराष्ट्रात उदयाला आला. महानुभाव पंथाचे मूळ पुरुष गोविंदप्रभू उर्फ गुंडम राऊळ होत व या पंथाचे आद्य प्रवर्तक श्रीचक्रधर हे होत. परंतु हा पंथ पंचावतारावर आधारित आहे. यातील पंचकृष्ण म्हणजे श्रीकृष्ण हा मूळ पुरुष होय. श्रीदत्तात्राय हे त्यातील दुसरा अवतार होय. श्री चांगदेव राऊळ हे तिसरा अवतार चवथा श्रीगोविंदप्रभू तथा गुंडमराऊळ व पाचवे म्हणजे श्रीचक्रधर. महानुभावपंथाचे हे प्रवर्तक होय.

महानुभावपंथीयांचे सर्व वाड्.मय या पंचकृष्णांभोवती निर्माण झाले आहे या पंचकृष्णांची माहिती चक्रधरांच्या सूत्रापाठात प्रारंभीच सांगितली आहे."

"जैसे द्वापारी श्रीकृष्ण चक्रवर्ती ।।१।। जैसे, सेहाद्री
श्रीदत्तात्राय प्रभू ।।२।। जैसे द्वारावतीये चांगदेवो राऊळ ।।३।।
जैसे ऋध्दिपूरी श्रीगुंडमराऊळ ।।४।। जैसे प्रतिष्ठान चांगदेव राऊळ ।।[१]

अशा प्रकारे महानुभावपंथाला प्रवर्तक लाभलेले आहेत.

महानुभाव पंथाची बैठक:

महानुभाव पंथ हा प्रामुख्याने साधकांचा पंथ आहे. त्यामुळे या पंथातील शिष्यासाठी असलेली आचार संहिता अत्यंत कडक आहे. संन्यस्त व ग्रहस्थ असे शिष्यांचे दोन वर्ग केलेले असून संन्याशाने नित्यभ्रमंती भिक्षाभोजन करावे एकांतवास पत्करून परमेश्वराचे नामस्मरण करावे अशी अपेक्षा आहे. कर्म, धर्म, विधी, विखारो. परित्योजोनी परमेश्वरा शरण रिगावे जीवेश्वर भेद भक्तियोग, संन्यास व हिंसा या चार प्रमुख तत्वांच्या आधारावर महानुभाव पंथाचा आचार धर्म उभा आहे.

साधकाने सर्व संग परित्याग करून एकांतवास सेवावा. देशाचा शेवटी झाडातळी जन्म क्षेपून राधनासनी भोजने परमेश्वरची होआवा. परंतु एका स्थळी स्थिर न राहता सतत भ्रमंती असावे. यासाठी स्त्रीचे दर्शन वर्ज्य करावे. चित्रातदेखील स्त्री पाहू नये. तिला बघून विकार वाटतात म्हणून विषयाला साक्षी होऊ नये. अशी प्रकारची त्यांची शिकवण आहे.

महानुभावपंथीयांना नुसते वैराग्य मान्य नाही तर ज्ञानयुक्त वैराग्य हवे आहे. आपण संपादन केलेल्या वैराग्याचे प्रदर्शन न करता म्हणून मात्रा होवूनी असावे कारण तो एक प्रकारचा विकारच आहे. स्पष्टच बोलावयाचे झाल्यास "जिनेनी मृताचा धर्मी वर्तावे" अशी महानुभावाची विरक्ताविषयीची कल्पना आहे. ईश्वर स्मरणावर त्यांचा भर अधिक आहे. असे त्यांचे सांगणे आहे. अहिंसा ही महानुभावीय चतु:सूत्रीतील महत्त्वाचे तत्त्व आहे. या अहिंसेचे पालन अतिशय काटेकोरपणे महानुभावीयांना करावे लागेल.

श्रीचक्रधरांनी आपल्या शिष्यांना भिक्षेविषयीचेही कांही नियम सांगितले आहेत. भिक्षा मागत असताना कोणतेही घर निवडायचे नाही. भिक्षा ओळखीच्या घरात मागावयाची नाही. तोरण लावलेल्या घरी भिक्षा मागावयाची नाही. भिक्षा ग्रहण करताना त्याची चव घेऊ नये. भिक्षा ही जिभेच्या चोचल्यासाठी नाही. तर देह उभा ठेवण्यासाठी आहे. ही भिक्षेमागील भूमिका आहे. परनिंदा परवार्ता करू नये. त्यापेक्षा झोप बरी. काम क्रोध व लोभ ही नरकद्वारे आहेत. त्याचा त्याग करावा.

अटनात एकमेकांस भेटलात तर श्रमनिवृत्ती करा. एकत्र खाणेपाणी करा. गुरुंच्याविषयी चर्चा करा. बरेच दिवस एकत्रित राहू नका. आर्त व्याकुळ लोकांच्याशी बोला. अन्य पंथीयांचा संबंध ठेवू नका. कर्मजड होऊ नका. अशा प्रकारचे हे नियम शिष्यांवर बंधनकारक होते. महानुभावीयांचा आचार-धर्म प्रतिक्षणी, प्रतिक्षणी त्यागू असे सांगतो हे नियम मोडणाऱ्यांना मोठी

शिक्षा असे चक्रधर आपल्या शिष्यांना मनाच्या अलिप्ततेतून ईश्वराची साधना सांगतात. देहाचा संबंध सुटला तरी परमेश्वर चिंतन सोडावयाचा नाही. हा त्यांचा ध्यास लक्षणीय आहे. कर्मकांड आणि सुखविलास यामध्ये रमणाऱ्या सामान्य संसारी जनाचा हा आचार धर्म आहे.

या पंथाची बैठक द्वैती मताची आहे. महानुभाव जीव, देवता, आणि प्रपंच व परमेश्वर या वस्तु मुख्य व नित्य मानतात. त्यांच्या मते या चार वस्तु स्वतंत्र, नित्य अनादी व अनंत आहेत. देवता या नित्यबध्द आहेत. जीवबध्द मुक्त आहेत. परमेश्वर नित्य मुक्त आहे व प्रपंच अनित्य आहे. जीव हा बध्दमुक्त आहे. म्हणजेच बध्द असूनही मुक्तीस पात्र असणारा असा आहे. त्याला मायेचे बंधन आहे. जीव हा पाच पिशांनी युक्त आहे. अनादी अविद्या अन्यथा ज्ञान जीवत्व, आदिमळ, या त्या पाच पिशी होत. अविद्या हे सर्व नाशाचे कारण आहे. परमेश्वर जीवाचा उध्दार करतो. जिवाला मोक्ष देतो.

महानुभावपंथात प्रपंचास स्थान नाही. प्रपंच अनित्य मानतात कारण प्रपंच व कार्यप्रपंच असे त्याचे दोन भाग आहेत. कार्यप्रपंचाची निर्मिती पंचमहाभुते व त्रिगुण यातून झाली आहे. महानुभावपंथात देवता या कनिष्ठ आहेत. त्या नित्यबध्द आहेत. त्या परमेश्वर होवू शकत नाहीत. म्हणून देवताची पूजा व उपासना यांना ते कमी लेखतात. महानुभावाची बैठक ही द्वैती बैठक आहे. व त्याचा मूळ पाया हा निवृत्ती आहे. निवृत्ती आणि सर्वसंग परित्याग यावर महानुभावपंथ अधिष्ठीत आहे.

आम्नाय:
=======

चक्रधरांच्या निर्याण कालानंतर महानुभाव पंथाची सर्व जबाबदारी आद्य आचार्य नागदेव यांच्यावर पडली. नागदेवाचार्यांच्या देहांतानंतर मात्र महानुभाव पंथाला उतरती कळा प्राप्त झाली. नागदेवाचार्य जिवंत असताना

ते स्वत:च सर्वांना दिक्षा देत. त्यामुळे अधिकरणे निर्माण होण्याचा प्रश्न नव्हता. पंथाच्या आद्य आचार्यांनी घालून दिलेला हा धडा पुढे कांही काळ-पर्यंत पंथीयांच्या स्मरणात चांगला राहिला होता. आचार्यांच्या तीन पिढयांपर्यंत पंथाची शिस्त चांगली होती. अधिकरणाचा अधिकार टिकून होता. त्याला फाटे फुटले नव्हते. म्हणजेच बाइदेव, कविश्वर व परशाराम या आचार्यांच्या तीन पिढयांपर्यंत सर्व कांही ठीक चालले होते. अधिकरण व अधिष्ठान एकच होते व त्याला सर्वजण मानत असत. अजूनही त्यांच्यात दुही झाली नव्हती. ती मात्र परसराम बासाच्या वेळी झाली. त्याच्या जवळ जवळ १३ उपशाखा झाल्या. या तेरा उपशाखांना तेरा"आम्नाय" मामण्यात आले. ते पुढीलप्रमाणे होत.

१. उपाध्ये, २. कव्रिश्वर, ३. पारिमांडल्य, ४) अमृते, ५. मदालसा, ६. कुमार, ७. यज्ञदेव, ८. दामोदर, ९. हरिदेव, १०. जयदेव, ११.साळकर, १२. दिवाकर, १३. महेश्वर अशा प्रकारे हे तेरा आम्नाय निर्माण झाले. याची माहिती"भीष्माचार्यकृत मार्गमंजीरी स्तोत्र" यात या तेरा आम्नायाची माहिती मिळते. पुढे यावेही आणखी पोटभेद झाले.

वरील सर्वच आम्नाय दीर्घकाळ टिकू शकले नाहीत. काळाच्या ओघात त्यातील बरेच नामशेष झाले. परंतु जुन्या नव्या कोणत्याही स्थितीत का होईना पण तेराही "आम्नाय" चालू आहेत. त्यांच्यातील भेद तात्विक स्वरुपाचे असले तरी आज ते केवळ बाहय स्वरुपाचे उरले आहेत. या तेरा आम्ना-यांचे लिपीसंकेतही भिन्न आहेत. पण अशा प्रकारचे बाह्य भेद सोडून दिल्यास त्याची विभागणी दोन गटात होते.

१. उपाध्ये आम्नाय व कविश्वर आम्नाय:

यापैकी पहिल्या गटात उपाध्ये आम्नाय प्रमुख असून दिवाकर, दामोदर, जयदेव, साळकर, व हरिदेव हे पाच आम्नाय त्यातच समाविष्ठ होतात. उपाध्ये आम्नायातील ग्रंथकारात सहयाद्री वर्णनकार खळोबास प्रमुख असून सकळ लिपीचे

जनक तेच होत. उत्तर काळातही या आम्नायाने पुष्कळ ग्रंथनिर्मिती केल्याचे दिसते. दुसऱ्या कविश्वर आम्नायाचे प्रमुख कविश्वर भास्कर भट असून परी-मांडील्य, मदालसा, अमृते, महेश्वर यक्षादेव व कुमार हे सहा आम्नाय त्यातच अंतर्भूत होतात. उपाध्ये आम्नायाचे प्रवर्तक जसे जानोपाध्ये नाहीत. तसेच कविश्वर आम्नायाचे प्रवर्तकही कविश्वर बास नाहीत त्याचे प्रवर्तक परशाराम बास आहेत. त्यांना उपदेव बादूदेव बासापासून होता. परशाराम बास यांना कविश्वराचे शिष्य मानले जाते. कविश्वर आम्नाय ही ग्रंथकारांनी संपन्न असून त्यातील स्वत: कविश्वर भास्कर भट्ट विश्वनाथबास, ऋध्दिपूर वर्णन-कर्ते नारायण बास, तिन्ही स्थळांची निर्मिती करणारे गुर्जर शिवबास व अनेक उत्तरकालीन ग्रंथकार प्रसिध्द आहेत. डॉ. कोलते म्हणतात त्याप्रमाणे "एखादा तसा कविश्वर आम्नायाचा वंशावृक्ष विद्वानाने गजबजलेला आहे." या आम्नायातील सध्यस्थितिपर्यंतच्या साहित्य निर्मितीचा आढावा डॉ. मचाले यांनी घेतला आहे.[१०]

वरीलप्रमाणे दोन प्रमुख आम्नायाच्या ग्रंथ लेखन पध्दतीत किंवा वस्त्राधारण पध्दतीत ते भेद आहेत. त्यात विशेष अर्थ नाही. तर त्याच्यातील तात्त्विक मतभेद मात्र महत्त्वाचा आहे. तो ज्ञानी, साधक व प्रेमी भक्त यांना प्राप्त होणाऱ्या अंतिम साध्याविषयी आहे. कविश्वर आम्नायाच्या मते. या दोहोंना मिळणारी गती एकच आहे. त्यात कोणत्याही प्रकारचा भेद नाही. उपाध्ये आम्नायाच्या दृष्टीने ज्ञानी व भक्त यांना प्राप्त होणाऱ्या साध्यात फरक आहे. त्यांच्या मते साधकाला केवळ ब्रह्माची प्राप्ती होते. तर प्रेमी भक्ताला ईश्वर स्वरूपाची प्राप्ती होते. व ब्रह्म् आणि ईश्वर ही उपाध्ये आम्नायाच्या मते एक नसून भिन्न आहेत. परंतु हा मतभेद एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्याच्यात वाटते तितके द्वैत नाही. उपाध्ये आम्नायात गोविंदप्रभूच्या नखाचे अवशेष परंपरेने चालत आले आहे तर कविश्वर आम्नायात त्यांच्या दाढेचे दोन अवशेष आहेत.

महानुभावीय शिष्य परंपरा:

महानुभावपंथ हा गुरुपरंपरेवर आधारीत आहे. या पंथात गुरु परंपरेला श्रेष्ठ स्थान आहे. महानुभावपंथाच्या पंचकृष्णाचे स्वरुप आणि त्यांच्या परस्पर संबंधात थोडी गुंतागुंत आहे. या पंचकृष्णांचे दोन गट पडतात. पैकी पहिल्या गटात स्वयंम श्रीकृष्ण हा एकच परमेश्वर अवतार येतो व दुसऱ्या गटात चार चार अवतार येतात. या चारींना दुसऱ्या गटात घालण्याचे कारण असे की त्या चारीत एक प्रकारची परंपरा आहे. या परंपरेत श्रीकृष्णाचा अवतार कुठे बसत नसल्यामुळे तो गट स्वतंत्रा आहे. इतर चौघांच्या बाबतीत शक्ती स्विकाराची परंपरा आहे. हा शक्ती स्वीकार पुढीलप्रमाणे आहे. श्रीकृष्ण हा स्वतंत्रा स्वयंभू आहे. दुसऱ्या गटात श्रीदत्तात्राय - चांगदेव राऊळ - गोविंदप्रभू - श्रीचक्रधार परंतु ही परंपरा इतकी सरळ नाही. तिच्यात बरीचशी गुंतागुंत आहे. या परंपरेतील दत्तात्राय हे महानुभावपंथाचे आधिकरण आहेत व हे सर्वमान्य आहे व चक्रधारांनी तसे अनेक वेळ म्हटलेही आहे. प्रथम दत्तात्रायांनी अवतार धारण केल्यावर त्यांनी स्वत:च पर आणि अवर या दोन शक्तिंचा स्वीकार केला. नंतर त्यांच्यापासून चांगदेव राऊळांना शक्तिस्वीकार झाला व त्यातूनच अपार शक्ति तेवढी प्रकट झाली. श्रीचांगदेव राऊळांपासून गोविंद-प्रभूंनी शक्ति स्वि कार स्वि कारला व त्यांनाही परशक्ती तेवढीच प्राप्त झाली. येथपर्यंत गुरुशिष्य परंपरा ही अगदी सरळ आहे. पण पुढे श्री चक्रध-रांच्या बाबतीत थोडासा गुंता आहे. श्रीचक्रधार म्हणजे चांगदेव राऊळच होत. कारण कामाख्या" नावाच्या बाईने त्यांच्याकडे शारिरसुखाची मागणी केली व ती तशीच त्यांच्या उंबरठयावर बसून राहिली. तेव्हा कांही दिवसानंतर आपला देहत्याग केला व हरपाळ देवाच्या मृत शारिरात प्रवेश करुन तो देह धारण केला. म्हणून तेच श्रीचक्रधार होत. म्हणून महानुभावपंथाच्या पंचकृष्णाच्या मालीकेत चक्रधारांचा निर्देश श्रीचांगदेव राऊळ असा येतो. या मालिकेत दोन चांगदेव राऊळ आहेत. १) द्वारावतीचे चांगदेव राऊळ,

२. प्रतिष्ठांचे चांगदेव राऊळ. द्वारावतीच्या चांगदेव राऊळांनी श्रीदत्ताकडून शक्ति स्वीकार स्वि.कारला होता. हरपाळ देवाच्या शरीरात प्रवेश केल्यानंतर गोविंदप्रभूकडून त्यांनी शक्तीस्वीकार केला त्यामुळे चक्रधारांना दोन शक्ती प्राप्त झाल्या. त्यातील एक स्वत:ची व दुसरी गोविंदप्रभूकडून प्राप्त झाली. याचा अर्थ असा की, गोविंदप्रभू हे श्रीचक्रधारांचे लौकीकदृष्टीने गुरु असले तरी श्रीदत्तात्रय प्रभू हेच त्यांचे परम गुरु होत. श्रीदत्तात्रेय प्रभू हे या परंपरेचे मूळ प्रवर्तक असल्याने तिला दत्त परंपरा म्हणावयास हरकत नाही."

पुढे आणाखी एक प्रश्न उभा रहातो की गोविंदप्रभू व चक्रधार यांच्यातील परस्पर संबंधाचा. श्रीगोविंदप्रभूकडून चक्रधाराने शक्तीस्वीकार केला म्हणून गोविंदप्रभूंचे ते शिष्य होत. परंतु चांगदेव राऊळाकडून गोविंदप्रभूंनी शक्तिस्वीकार केला होता. म्हणून ते गोविंदप्रभूंचे गुरुही होत. ही गुरुशिष्य परंपरा अशी गुंतागुंतीची आहे. त्यातूनच चक्रधारांचे गोविंदप्रभूशी दुहेरी नाते सिध्द होते. परंतु या दोन भूमिका परस्पर विरोधी आहेत.

महानुभाव पंथातील पंचकृष्णात ही गुंतागुंत येथेही संपत नाही. कारण परमेश्वराचा मूलावतार जो श्रीकृष्ण चक्रवर्ती याचा विचार या परंपरेत पाहिजे तितका झालेला नाही. श्री दत्तात्रायप्रभू जर या मार्गातील अधिकरण होत परंतु त्यांचे नांव पहिले न येता ते श्रीकृष्णाकडे जाते. याला कारण असे की, दत्तावताराच्या परंपरेत श्रीकृष्णाला स्थान नसल्याने त्याचे नांव प्रथम व नंतर श्रीदत्तात्रायाचे असा क्रम लावून या परंपरेला आरंभ केला असावा. किंवा श्रीकृष्ण हा चक्रवर्ती असल्यामुळे त्याचे नांव प्रथम आले असावे. कारण, एका दृष्टीने श्रीकृष्णालाही दत्त परंपरेत बसवता येते. ज्या यादववंशात श्रीकृष्णाचा जन्म झाला त्या यादवांना दत्तात्रायाचा अनुग्रह होता. असे डॉ. वि.भि. कोलते यांनी भागवताच्या एकादश स्कंधातील "यदुअवधूत संवादावरून" दाखवून दिले आहे.[१२] श्रीकृष्णाच्या संबंधात आणखी एक गूढ आहे. श्री चांगदेव राऊळ, श्रीगोविंदप्रभू व श्रीचक्रधार हे तिघेही श्रीकृष्णाचे अवतार

मानले जातात या सर्वांनी श्रीदत्तात्रयाकडून अनुग्रह घेतला आहे. पैकी चांगदेव राऊळ श्रीकृष्ण असल्याची सूचना त्यांच्या चरित्रात मिळते. गोविंदप्रभूंनी आपण रुक्मिणीच्या राऊळात जेवल्याची द्वापार युगाची आठवण सांगितली आहे. श्रीचक्रधार यांनीही आपल्या लीळाचरित्रात "आमुचे गोसावी साक्षात श्रीकृष्ण चक्रवर्ती," असे अनेक वेळा म्हटले आहे. यातून त्यांची श्रध्दा चित्रित झाली आहे. याचा अर्थ असा की चांगदेव, गोविंदप्रभू व चक्रधार या तिघात श्रीकृष्ण व दत्तात्रय या दोन अवतारांचे मिश्रण झाले आहे. म्हणजेच या पंथाचे अवतारीत्व श्रीकृष्णापासून चालत आले आहेत.

## चक्रधारांचा शिष्य समुदाय:

महानुभावपंथाच्या पंचकृष्णापैकी महानुभावपंथाचा विस्तार झाला तो श्री चक्रधारांच्या कालावधीत. चक्रधारांचा शिष्य संप्रदाय हा मोठया प्रमाणावर आहे. आणि म्हणूनच त्यांना धर्माचे आद्य प्रवर्तक म्हटले गेले आहे. या शिष्य वर्गात पुरुष आणि स्त्रिया यांचा समावेश आहे. त्याच्यात विधवा स्त्रियांही आहेत. याच्यात ब-याच अंशी सामान्य लोकांचीच संख्या मोठी आहे. त्याच्यात भटोबास (नागदेवाचार्य), दादोस, काकोस, म्हाइंभट्ट, उमाइसा, बाइसा, देमाइसा, लखूबाइसा, मार्तंड, आक्सा, महदंबा इत्यादी अनेक शिष्यांचा समावेश आहे. परंतु नागदेवाचार्य, म्हाईंभट्ट व महदंबा यांना त्याच्यातील महत्त्वाचे स्थान आहे. नागदेवाचार्य आणि महदंबा यामुळे चक्रधारांचे व्यक्तिमत्व जनसामान्यांनसमोर उलगडत गेले व म्हाइंभटाने तर आपल्या साहित्यातून त्यांना अमर केले. त्यांच्या शिष्यांनी आणि महानुभाव पंथातील पंडितांनी विविध प्रकारची साहित्य निर्मिती केली.

## महानुभावीय वाङ्.मय:

महानुभावीयांचे सर्व वाङ्.मय हे पंथनिष्ठेवरच आधारलेले आहे व पंथ निष्ठा हेच त्याची प्रेरणा आहे. हे सर्व साहित्य गद्य व पद्य स्वरूपात आहे.

१. गद्य :

"लीळाचरित्र" हे आद्य चरित्रकार म्हाइंभट्ट यांनी चक्रधरांच्या लीळा संग्रहीत करून त्या संपादित केल्या आहेत. म्हणून तो मराठीतील पहिला चरित्र ग्रंथ आहे. लीळाचरित्राची विभागणी एकांक पूर्वार्ध व उत्तरार्ध अशा तीन विभागात असून त्याची एकून लीळासंख्या १५०९ इतकी आहे. लीळाचरित्राची रचना शके १२०५ ही मानण्यात येते.

२. गोविंदप्रभू चरित्र हा म्हाइंभट्टाचा दुसरा चरित्र ग्रंथ आहे. हे गोविंदप्रभू यांचे जीवन चित्रण आहे. ते स्मृती स्थाने लिहिले गेले आहे. महानुभावपंथात या ग्रंथाचा नामोउल्लेख 'ऋध्दिपूर' लीळा किंवा 'ऋध्दिपूर चरित्र' असा केला आहे. गोविंदप्रभूंचा अवतार हा दवडण्याचा अवतार आहे व हा अवतार वेडापिसा आहे. चरित्र लेखकाला आवश्यक वाटणारा सहवास जिव्हाळा त्याचबरोबर सत्यता ही या ग्रंथाची वैशिष्ठये आहेत आणि त्यामुळे सर्वार्थाने हा ग्रंथ परिपूर्ण आहे.

३. दृष्टांतपाठ:

हा ग्रंथ केसोबासांनी संपादित केला आहे. चक्रधरोक्त तत्वज्ञान केसोबासानी शास्त्रोक्त पध्दतीने या ग्रंथात मांडलेले आहेत. दृष्टांतपाठात एकूण ११४ दृष्टांतांचे संपादन झाले आहे. हे दृष्टांत म्हणजे उपदेशपर कथाच आहेत.

४. सूत्रपाठ:

या ग्रंथात लीळाचरित्रात चक्रधरांच्या तोंडी जी सूत्रे आलेली आहेत त्याचे क्रमवार संपादन केसोबासांनी या ग्रंथातून केले आहे. या ग्रंथात एकूण १२५५ सूत्रे आहेत व हा ग्रंथ १२०२ च्या सुमारास संपादीत केला गेला आहे. महानुभावांचे तत्वज्ञान याच ग्रंथांच्या आधारे तयार झाले आहे. या ग्रंथाचे श्रेष्ठत्व वर्णताना अ.ना. देशपांडे म्हणतात यातील एकेक सूत्र म्हणजे एकेक प्रभावी औषधी मात्रा आहे.[१३]

५. मूर्तिप्रकाश:

हा ग्रंथ केसोबासांचा असून त्याची रचना १२११ मध्ये केली आहे. या ग्रंथात चक्रधरांच्या मूर्तीचे वर्णन केले आहे. त्यातच चक्रधरांच्या तत्वज्ञानाचे निरुपण केले आहे पण हा ग्रंथ अतिशयोक्तीपूर्ण वाटतो.

६. स्मृतीस्थळ:

लीळाचरित्राप्रमाणेच हा ही एक चरित्रग्रंथ आहे. महानुभावपंथाचे आद्य आचार्य नागदेव यांच्या स्मृती या ग्रंथात संग्रहीत केल्या आहेत. स्मृती स्थळात एकूण २६१ स्मृती संग्रहीत केल्या आहेत. या ग्रंथाची रचना नागदेवाचार्यांच्या मृत्यूनंतर शाके १२३० च्या सुमारास झाली आहे. याची भाषाशैली अत्यंत साधी आणि सोपी आहे त्यातून तत्कालिन राजकीय,सामाजिक व धार्मिक परिस्थितीचे चित्रण साकार झाले आहे.

याशिवाय स्थानपोथी, गद्यराज, हे संप्रदायातील ग्रंथ उल्लेखनिय आहेत. स्थानपोथी हा ग्रंथ पंथीय दृष्टीकोनातून महत्त्वाचा आहे. ११९ गावे व १५३ देवदेवतांचे उल्लेख तीत सापडतात. श्रीचक्रधर व गोविंदप्रभू यांच्या स्पर्शाने पुनित झालेल्या स्थळांची माहिती या ग्रंथात एकत्रित स्वरुपात मिळते. "गधराज" हा महानुभाव संप्रदायातला आणखी एक महत्त्वाचा ग्रंथ नियेमक श्लोक रचना असलेला पद्यग्रंथ हे त्याचे वैशिष्टय आहे. यातील एकूण श्लोकांची संख्या २७९ आहे व याचे लेखक हयग्रीवाचार्य हे आहेत. या ग्रंथाची रचना शाके १२३१ ते १२४६ च्या दरम्यान दशम स्कंधावरील ही टीका लिहिली असावी.[१४]

पद्यसाहित्य:

महानुभावपंथाची साहित्य रत्नांची खाण खाचून भरलेली आहे. त्यात गद्य साहित्याबरोबरच पद्य साहित्यही मोठया प्रमाणावर आहे. यात

महानुभावपंथाच्या साती ग्रंथांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. महानुभाव पंथाच्या देवा-यातील ते पुजनीय ग्रंथ आहेत. हे ग्रंथ संप्रदायाच्या प्रारंभीच्या काळात लिहिले गेले आहेत. या ग्रंथांचा मूलाशाय श्रीकृष्णभक्ति हाच आहे. हे सातही ग्रंथ ओवीबध्द काव्यग्रंथ आहेत.याचे निर्माते महानुभावीय पंडित आहेत. त्यातील बहुतेकांना चक्रधरांचा सहवास लाभला आहे. ते चक्रधरांना पंच कृष्णांपैकीच एक मानतात. श्रीकृष्ण हेच त्यांचे आराध्य दैवत आहे. आणि त्याचमुळे श्रीकृष्ण भक्तिने उजळलेले हे महानुभावीयांचे सात ग्रंथ म्हणजे प्रबंध काव्य आहेत त्यांची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे -

१) रुक्मिणी स्वयंवर:

हे कथाकाव्य रामदेवरायाच्या दरबारी असलेल्या "नरेंद्र" याने लिहिले आहे. या ग्रंथाची ओवी संख्या १८०० असून ते इ.स. १२९२ ला लिहिले गेले आहे. यात कृष्णरुक्मिणी विवाहाचे वर्णन आलेले आहे.

२) शिशुपालवध:

या ग्रंथाची निर्मिती भास्करभट्ट बोरीकरांनी केलेली असून हा ग्रंथ शाके १२३५ मध्ये तयार झाला. याची एकंदर ओवीसंख्या १०८७ इतकी आहे. यातील कथानक हे शिशुपाल वधाचे आहे. या ग्रंथावर नरेंद्राच्या रुक्मिणी स्वयंवराची छाप उमटलेली दिसते. शिशुपाल वध हे प्रबंध काव्य वाटते.

३) उध्दवगीता:

हा ग्रंथ भागवताच्या एका दशस्कंधावर आधारित असून या ग्रंथाची रचना भास्करभट्ट बोरीकरांनी शाके १२३६ ला केली आहे. या ग्रंथाची ओवी संख्या ८२७ इतकी असून या ग्रंथात कृष्णमूर्तीचे वर्णन आलेले आहे.

४) वत्सहरण:

हा ग्रंथ शाके १२३८ मध्ये दामोदर पंडितांकडून लिहिला गेला आहे. भागवताच्या दशम स्कंधातील १२, १३ व १४ अध्यायात वत्सहरणाची व अघासुराची कथा आली आहे. त्या कथेवर आधारित ५०३ ओव्यांचे हे कथाकाव्य आहे.

५) ज्ञानप्रबोध:

या ग्रंथाची निर्मिती पंडित विश्वनाथ बाळापूरकर यांच्याकडून शाके १२५३ मध्ये केली गेली आहे. या ग्रंथाची ओवी संख्या १२०४ इतकी आहे. त्यामुळे त्याला प्रबंध काव्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. गीतेतील १३व्या अध्यायामध्ये ज्ञानलक्षणे सांगणाऱ्या श्लोकावरील हे भाष्य आहे.

६) सह्याद्रीवर्णन:

या ग्रंथाची निर्मिती पंथीय उपासकाच्या भूमिकेतून रवळोव्यास उर्फ राधोपाध्याय पाथरीकर यांनी शाके १२५५ मध्ये केली. या ग्रंथाची ओवी संख्या ५१७ इतकी असून यात दत्तात्रयाचे मूर्तीवर्णन, दत्तात्रयाचे चरित्र व उरलेल्या भागात चक्रधर चरित्र आलेले आहे.

७) ऋध्दिपूरवर्णन:

या ग्रंथाचे स्थान महानुभाव पंथीयांच्या साती ग्रंथांत काव्यगुणदृष्टया स्वतंत्र आहे. या ग्रंथाची निर्मिती नारोव्यास बहाळीये यांनी शाके १२८५ मध्ये केली. या ग्रंथाची ओवीसंख्या ६४१ इतकी आहे. या ग्रंथात गोविंद-प्रभूंचे वास्तव्य असणारे ऋध्दिपूर या धर्मक्षेत्र आणि तीर्थक्षेत्र असणाऱ्या स्थळांचे वर्णन आले आहे.

मराठीतील आद्य कवयित्री - महदंबा

महानुभावपंथात ग्रंथ रचना करणाऱ्या साहित्यिकात आद्य कवयित्री पदाचा मान महदंबेचा आहे. तिने साहित्य निर्मिती करुन महानुभावपंथातील साहित्याची खाण समृध्द केली आहे. तिचे मूळ नांव रुपाई असे आहे. तिला बालपणीच वैधव्य प्राप्त झाल्याने ती चक्रधरांची शिष्या बनली त्यांच्या सहवासात तिच्या चर्चक जिज्ञासक वृत्तीमुळे ती ज्ञानसंपन्न झाली. त्यातूनच तिचे साहित्य आकाराला आले.

धवळे: चक्रधरांच्या निर्वाणानंतर महदंबा चक्रधरांच्या शिष्यांना बरोबर घेऊन गोविंदप्रभूंच्या सहवासात गेली आणि एक दिवस बाशिंग घेऊन जाणारी एक तेलीन दिसली. महदंबेने गोविंदप्रभूसाठी एक बाशिंग करुन मागितले आणि ते गोविंदप्रभूंच्या श्रीमुकुटी बांधिले. अशा या विवाह समारंभ प्रसंगी गोविंद-प्रभू महदंबेला म्हणाले "आवो मेली जाय : गाय गाय म्हणे". त्यावेळी तिला स्फूर्ती झाली आणि तिने गाणे गाइले. तेच धवळे होत. धवळे म्हणजे लग्नात गावयाचे वरविषयक गीत. या धवळ्यांची रचना शके १२०९ पूर्वी केव्हातरी झालेली आहे. या धवळ्याचे दोन भाग पडतात. एक पूर्वार्ध व दुसरा उत्तरार्ध, पुर्वार्धातील धवळ्यांची संख्या ८३ आहे. पूर्वार्ध हा महदंबेचा म्हणूनच ओळखला जातो. यात कृष्णरुक्मिणी स्वयंवराची कथा महदंबेने गुंफलेली आहे.

धवळ्याचा उत्तरार्ध पूर्णतया महदंबेकडे जात नाही. तर त्याची निर्मिती म्हाइंभट्ट व लक्ष्मींद्र-भट्ट यांच्या नांवावर लावली जाते. उत्तरार्ध हा शके १२३० पूर्वीचा संभवतो. उत्तरार्धातील धवळ्यांची संख्या ६३ इतकी आहे. हे ही कथाकाव्य महदंबेनेच गाइले व तिच्यासाठी निर्माण केले गेले. म्हणून ते महदंबेचेच आहे. असे महानुभाव पंथात म्हटले जाते. या उत्तरार्धात कृष्णरुक्मि - युध्द याचे वर्णन आले आहे. तसेच कृष्णाचे रुक्मिणीसह द्वारकेस आगमन

नगर प्रवेश इत्यादीचे हे वर्णन आहे. स्वाभाविकता, गतिमानता, सहज सुंदरता, आणि स्त्री सुलभता व उत्स्फूर्तता हे धवळ्याचे विशेष आहेत.

मातृकी-रुक्मिणी स्वयंवर:

महदंबेचे हे दुसरे काव्य असून त्याची रचना मातृकांत वृत्तांत आहे. याची एकूण ओवी संख्या १०९ इतकी आहे. त्यातील १ ते ८२ ओव्यात "क" ते "क्ष" पर्यंत मातृका आहेत. ८३ ते १०१ ओव्या "अ" पासून "ड" पर्यंत व नंतर "भ", ट, च, द, व, म, न, व असा अक्षरक्रम आहे. यात कृष्णरुक्मिणी स्वयंवराचे कथानक आले आहे. हे कथानक व धवळ्यातील कथानक एकच आहे. फरक आहे तो वृत्ताचा आणि म्हणूनच प्राध्यापक वा.ना. देशपांडे म्हणतात. "धवळे या ध्वनीचा मातृकी-रुक्मिणी स्वयंवर हा शुध्द प्रतिध्वनी होय."[१५]

महदंबेच्या नावावर कांही गर्भकांडाच्या ओव्याही आहेत. महदंबेच्या नांवावर वा.ना. देशपांडे यांना एक आरतीही सापडली आहे. ती पुढील प्रमाणे आहे.

अमरगण गगनीं पाहाति आनंदे :
काळ्या-दमन केले रायें गोवींदें :।। धृ.।।
भुजंग जीणौनि आले मुरारी :
क्रीडावळी पुढां पढती नागारी :।। छ।।
माहादाइसांचे स्वामी श्रीसर्वेस्वरु :
तो पाहे वो सुंदरी परमेश्वरु:।। १।।[१६]

अशा प्रकारे महदंबेने साहित्य निर्मिती करुन महानुभावपंथाचा साहित्य खजिना समृध्द केला आहे व मराठी साहित्यातील आद्य कवयित्री पदाचा मान मिळविला आहे. हा मान जसा तिचा आहे तसाच ते महानुभाव पंथाचा आहे.

.....

## प्रकरण दुसरे

### संदर्भ साहित्य


१. महानुभाव संत, वसंत स. जोशी, मॉडर्न बुकडेपो प्रकाशन, पुणे ३०, आवृत्ती पहिली, पान क्र.४

२. एकनाथी गाथा, ओवी क्रमांक ३८९१ व ३७३७/३८.

३. महानुभाव संशोधन, वि.भि. कोलते, प्रथमावृत्ती, १९६२, पृष्ठ क्र.२५

४. सूत्रपाठ (चक्रधर), लीळाक्रमांक १८८, १८९.

५. महानुभाव संशोधन, वि.भि. कोलते, प्रथमावृत्ती, १९६२, पृष्ठ क्र. २८, २९.

६. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड पहिला, (संपा.) शं.गो. तुळपुळे, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, प्रथमावृत्ती, १९८४, पृ.क्र. १९२.

७. स्मृती स्थळ, (संपा.) वा.ना. देशपांडे, दुसरी आवृत्ती,१९६०, पृष्ठ क्र. १०३, १०४.

८. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड पहिला (संपा.) शं.गो. तुळपुळे, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, पहिली आवृत्ती पृष्ठ क्र. १९३.

९. श्रीचक्रधरोक्त सूत्रपाठ, (संपा.) ह.ना. नेणे, तृतीयावृत्ती, १९४२, पृ.क्र. १.

१०. कविश्वर कुळाचा वृध्दाचार परंपरा आणि वाङ्मयीन संशोधनात्मक अभ्यास, जे.टी. मचाले, पीएच्. डी.चा अप्रकाशित प्रबंध, नागपूर विद्यापीठ, नागपूर, १९८१

११. मराठी वाङ्‌मयाचा इतिहास (संपा.) शं.गो. तुळपुळे, खंड पहिला, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, प्रथमावृत्ती, पृष्ठ क्र. २०९.

१२. खाळोबासकृत सहयाद्री वर्णन, (संपा.) वि.भि. कोलते, १९६४, प्रस्तावना, पृष्ठ क्र. ४६.

१३. प्राचीन मराठी वाङ्‌मयाचा इतिहास, भाग पहिला, पूर्वार्ध, अ.ना. देशपांडे. पृ - १

१४. प्राचीन मराठी वाङ्‌मयाचा इतिहास, ल.रा. नसिराबादकर, फडके प्रकाशन, तिसरी आवृत्ती, १९८८, पृष्ठ क्र. २६.

१५. आद्य मराठी कवयित्री, (संपा) वा.ना. देशपांडे, कॉण्टीनेंटल प्रकाशन टिळक रोड, पुणे, २, द्वितीय आवृत्ती, १९५६, पृ.क्र. १३.

१६. -"- उ.नि.

.....